# बीज तंत्रज्ञान संशोधन व पैदासकार बियाणे विभाग

## वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

फोन/फॅक्स : ०२४५२-२२०८९९ ई-मेलः parbhaniseed@gmail.com


जा.क्रं.एसटीआरयु & बीएसपी/ ४९८ /२० दिनांकः १९/१०/२०२०

**जाहीर संक्षिप्त ई-निविदा सुचना**

१) बीज तंत्रज्ञान संशोधन व पैदासकार बियाणे विभागाच्या कार्यालयीन प्रयोगशाळेतील तसेच प्रक्षेत्रावरील खरीप/रब्बी हंगाम २०२०-२१ मध्ये घेण्यात आलेल्या/ येणा-या प्रयोगांना पाणी देणे, प्रयोगाची निरीक्षणे घेणे, तसेच संगणकाचालका कडुन संगणकाव्दारे कार्यालयातील दैनंदिन कामे करणे २) बिज प्रक्रिया केंद्र, वनामकृवि, परभणी कार्यालयातील खरीप व रब्बी हंगाम उत्पादीत बियाणे प्रक्रिया, पॅकींग, बियाणांची गोदामा अंतर्गत वाहतुक करणे, संगणकावर काम करणे, टॅग प्रिंटिंग करणे, बियाणे नमुने करणे, बियाणाचे पिशवीवर माहिती लिहीणे तसेच बियाणे साठवणुकीच्या विविध दहा गोदामांचे रात्री दोन पाळ्यामध्ये संरक्षण करणे, ३) खानापुर अ, खानापुर ब व शेंद्रा अ विभागाच्या पैदासकार बिजोत्पादन प्रक्षेत्रावरील खरीप/रब्बी हंगाम २०२०-२१ मध्ये सोयाबिन, तुर, ज्युट, कापुस, मुग, हरभरा व करडई इत्यादी पिकाचा सुधारित वाणाचे पैदासकार/ पायाभुत/ सत्यतादर्शक कार्यक्रम राबविण्यात येतो. तसेच, या कार्यालयातील संगणकाचालका कडुन संगणकाव्दारे कार्यालयातील दैनंदिन कामे करणे, ट्रॅक्टर चालकाकडुन प्रक्षेत्रावरील नांगरणी, मोगडणी, पिकाची पेरणी, फवारणी व कंम्बाईन हार्वेस्टरने पिकाची काढणी करणे, तसेच अकुशल मजुरांकडुन प्रक्षेत्रावरील बैलजोडीने पिकांची कोळपणी करणे व स्त्री मजुरांकडुन पिकांची खुरपणी करणे. तसेच मालमत्तेची व विविध प्रकारच्या पैदासकार व प्रमाणित बिजोत्पादनाच्या पिकाची दिवसा व रात्री देखरेख, देखभाल व इतर दैनंदिन कामे करण्यासाठी या विभागात कायम मजुरांची कमतरता असल्यामुळे कंत्राटी पध्दतीने मजुरांची आवश्यकता असते. तसेच, कापुस बिज प्रक्रीया केंद्र खानापूर अंर्तगत प्राप्त कापसाची जिनिग, डिलीटींग, बियाणे स्वच्छ करणे, बॅगींग, टॅगींग व सीलींग करणे इत्यादी कामासाठी कंत्राटी पध्दतीने त्यांची ई-निविदा पद्धतीने करुन घेण्यासाठी **ई-निविदा सुचना २०२०-२१** (कालावधी १२ महिने) **https://mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्याचे अवलोकन करुन ई-निविदा सुचनेतील तपशिल प्रमाणे ईच्छुक नोंदणीकृत संस्था / गुत्तेदार यांचा कडुन ‘अ’ आणि‘ब’ दोन लिफाफा पद्धतीने **खुला** ई-निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा फार्म व निविदेच्या सविस्तर नियम व अटी उपरीक्त संकेतस्थळावर पाहता येतील. त्याचे अवलोकन करुन उचित कार्यवाही करावी. सदर ई-निविदा फार्म भरण्यासाठी आपणास **https://mahatenders.gov.in** पोर्टलवर **दिनांक २१/१०/२०२० ते दिनांक २७/१०/२०२०** दरम्यान उपलब्ध आहे.

***स्वाक्षरीत/-***

**अध्यक्ष ई-निविदा समिती तथा**
**सहयोगी संचालक (बियाणे)**